# 'बीकेसी'तून नजर

## आरे कारशेडला विलंब झाल्याने मेट्रोच्या नियंत्रणाचा भार

म. टा. खास प्रतिनिधी

- मेट्रो ३ मार्गिकेच्या कामाला गती
- बीकेसी स्थानक असेल सर्वात मोठे



मुंबई : सध्या सर्वाधिक जलदगतीने काम सुरू असलेल्या 'मेट्रो-३' मार्गाच्या पहिल्या टप्प्याचे केंद्रीकृत नियंत्रण सुरुवातीला बीकेसी स्थानकातून होणार आहे. आरेतील जागा मिळण्यास विलंब झाल्याने हे केंद्र तातडीने बीकेसी स्थानकात सुरू केले जात आहे. त्यामुळेच हे स्थानक या मेट्रो मार्गावरील सर्वात मोठे असेल.

मुंबईला पश्चिमेकडून उत्तर ते दक्षिण जोडण्यासाठी मेट्रो ३ची उभारणी होत आहे. दक्षिणेकडे कफ परेड तर उत्तरेकडे सिप्झ हे या मार्गावरील अखेरचे स्थानक असेल. अशा एकूण २७ स्थानकांची या मार्गावर भूमिगत उभारणी सुरू आहे. केंद्रीकृत नियंत्रण केंद्राची सुविधा असलेल्या या २७ पैकी सर्वात मोठे स्थानक हे 'वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स' (बीकेसी) असेल.

संबंधित सूत्रांनुसार, मेट्रो ३मधील सर्व स्थानके ही सरासरी २५० मीटर लांब व २५ मीटर रुंदीची आहेत. पण बीकेसी स्थानक मात्र त्याला अपवाद आहे. हे स्थानक जवळपास ४७४ मीटर लांब आणि ३२.५ मीटर रुंद आहे. कारण या स्थानकातच मेट्रोवरील देखरेखीसाठी नियंत्रण कक्ष असेल. हे कक्ष उभा करण्यासाठीची तयारी जोमाने सुरू आहे.

मेट्रो ३च्या सर्व प्रकारच्या देखभालीचे मुख्य केंद्र वास्तवात आरेच्या जंगलात आहे. तेथे कारशेड तर उभे होणार आहेच. त्याखेरीज संपूर्ण मार्गावर देखरेख ठेवणारे केंद्रीकृत नियंत्रण केंद्रही तेथेच उभे होणार आहे. परंतु आरेची जमीन मिळण्यास विलंब झाला आहे. यामुळे हा प्रकल्पही सुमारे दीड वर्षे लांबणीवर पडला आहे. या स्थितीत पहिला टप्पा जून २०२३पर्यंत सुरू करायचा असल्यास तोपर्यंत केवळ कारशेड उभे होऊ शकेल. त्याच ठिकाणी नियंत्रण कक्ष तोपर्यंत उभे होणे अवघड आहे. यामुळेच किमान पहिल्या टप्प्याचे केंद्रीकृत नियंत्रण कक्ष हे बीकेसी स्थानकात उभे केले जाणार आहे. दुसरा टप्पा सुरू होईपर्यंत अर्थात डिसेंबर २०२४पर्यंत आरेमध्ये असे केंद्र उभे होऊ शकेल, असे नियोजन केले जात आहे.

### दोन टप्पे असे...

मेट्रो ३चा पहिला टप्पा सिप्झ (आरे) ते बीकेसी उत्तर असा असेल. तर दुसरा टप्पा बीकेसी दक्षिण ते कफ परेड असेल. आता उभारणी सुरू असलेले केंद्रीकृत नियंत्रण केंद्र पहिल्या टप्प्यात असल्याने ते बीकेसी उत्तर स्थानक परिसरात असेल.